महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५पीएलसी१५३६४५

मुख्य अभियंता (देयक व महसूल)
४ था मजला, प्रकाशगड, प्लॉट क्र. जी ९, प्रा. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-६९८५२२०० (का.)/विस्तारित क्र. २४६५
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
ई - मेल : cebilling@mahadiscom.in

क्र. मु.अ.(दे. व म.)/देयके/ल.दा/सुरक्षा ठेव/ No 37156: दिनांक: 19 NOV 2025

सर्व अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
सर्व मंडळ कार्यालये

विषय: सुरक्षा ठेव रक्कम प्रस्तावाबाबत -कामकाज व कार्यपद्धती संदर्भात स्पष्टीकरण.

संदर्भ: १) मुअ (वाणिज्य)/सुरक्षा ठेव रक्कम प्रस्ताव/२५८४९ दि. १२.०८.२०२५
२) CE (B&R)/SD/online/३४०५१ दि. १०.१२.२०१९

संदर्भ क्र. (१) नुसार सुरक्षा ठेव प्रस्तावाबाबतचे कामकाज देयक व महसुल (B&R) विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहे. तथापि संदर्भ (२) नुसार अंमलात आलेल्या ऑनलाइन SD Refund प्रणालीद्वारे ग्राहकांकडून अर्ज सादर करणे ते सुरक्षा ठेव रकमेचा परतावा RTGS/NEFT मार्फत ग्राहकाच्या बँक खात्यात जमा होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीनेच पूर्ण करावयाची आहे. त्यामुळे, सुरक्षा ठेव (SD Refund) प्रस्तावाबाबतची कार्यपद्धती यापूर्वीप्रमाणेच कायम राहील. तसेच क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आलेली अधिकार मर्यादा (Delegation of Powers) देखील यापूर्वीप्रमाणेच लागू राहील.

सबब, सर्व संबंधित कार्यालयांना सूचित करण्यात येते की, सुरक्षा ठेव परतावा प्रस्ताव यापूर्वीप्रमाणेच ऑनलाइन प्रणालीद्वारेच कार्यान्वित करावेत व विद्यमान अधिकार मर्यादेनुसार मंजूर करावेत.

मुख्य अभियंता
(देयक व महसूल)

प्रत सविनय सादर :-

१) संचालक वाणिज्य, महावितरण , प्रकाशगड, मुंबई.
२) कार्यकारी संचालक (दे व म), महावितरण , प्रकाशगड, मुंबई.
३) सह व्यवस्थापकीय संचालक, कोकण / छ. संभाजी नगर, प्रादेशिक विभाग , महावितरण.
४) प्रादेशिक कार्यकारी संचालक, पुणे / नागपूर, प्रादेशिक विभाग, महावितरण.

प्रत सस्नेह रवान:-

१) सर्व मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परिमंडळ कार्यालये
२) मुख्य अभियंता (वाणिज्य), महावितरण , प्रकाशगड, मुंबई.